# ८० . एका चिमणीची गोष्ट

मित्रांनो दचकलात ! थांबा पान उलटू नका . मी तुम्हाला आपण सर्वांनी लहानपणी ऐकलेली चिमणी व कावळयाची गोष्ट सांगणार नाहीये . खरेतर ही गोष्ट व अशाच कितीतरी गोष्टी ऐकत आपण लहानाचे मोठे झालो . बरेच वेळा ह्या गोष्टी मोठेपणापर्यंत आपल्या लक्षात रहात नाहीत . ह्या गोष्टींचा खरा मतितार्थही लहानपणी समजत नसतो .

मी तुम्हाला सांगणार असलेली गोष्ट मी खूप लहानपणी इयत्ता २ रीत ( १९५८ ) असताना माझ्या काकूकडून ऐकली होती . काही कारणाने ती गोष्ट मला एका प्रसंगात आठवली व ह्या गोष्टीचा मतितार्थ / भावार्थ माझे मन शोधू लागले .

थांबा प्रथम गोष्टच सांगतो . एका गावात एक दिवस आग लागते . गावातली मंडळी आग लागलेल्या घराकडे धाव घेतात व प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार मदतकार्य सुरू करतो . कोणी विहीरीतून पाणी काढून घरावर ओतू लागतो , कोणी घरातील चीजवस्तू वाचवण्याचा प्रयत्न करतो , कोणी बाजूच्या गोठयातील गाई , म्हशी, बैल यांना सोडवून दुर नेऊन बांधतो , कोणी घरातील मंडळींना धीर देत राहतो . घराच्या अंगणात असलेल्या झाडावर एका चिऊताईचे घरटे असते . थोडयावेळात चिमणी झाडावरून झेप घेते व विहीराच्या बाजूला असलेल्या हौदातून चोचीने पाणी घेते व उडत उडत त्या आगीवर टाकत राहते .

ब-याच वेळाने आग विझते . चिमणीपण थकलेली असते . ती आपल्या घरटयात विसावते ना विसावते तोच त्या झाडावरील दुस-या फांदीवर राहणारा कावळा येतो व चिमणीला चिडवू लागतो . तो चिमणीला म्हणतो कि तुझ्या प्रयत्नाने आग विझलेली दिसतेय . तुला खरेतर बक्षिसच द्यायला हवे . चिमणी शांतपणे सर्व ऐकून घेते व कावळयाला उत्तर देते कि सर्वांच्या प्रयत्नानेच आग विझली . मला जे सुचले , शक्य होते ते मी केले . पण एक गोष्ट लक्षात ठेव कि जेव्हा आगीची माहिती गोळा केली जाईल तेव्हा माझे नाव आग विझवणा-यांच्या यादीत असेल , आग लावणा-यांच्या यादीत नसेल . उत्तर देऊन चिमणी घरटयात परतते व काय समजायचे ते समजून कावळा आपल्या फांदीवर जातो .

ज्या वयात ही गोष्ट ऐकली तेव्हा एवढाच अर्थबोध झाला होता कि संकटाच्या वेळी प्रत्येकाने यथाशक्ती दुस-याला मदत केली पाहिजे . खरेतर काकू आम्हा सर्व भावंडांना सांभाळायला आमच्या घरी काही महिन्यांकरता आली होती . कारण माझे वडिल तळेगावच्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते . आई सुद्धा त्यांच्याबरोबर सोबतीला होती . घरात माझी मोठी बहिण व २ मोठे भाऊ अशी फौज होती . मी त्याच वर्षी शाळेत जायला लागलो होतो . पहिलीचा अभ्यास घरीच करून परिक्षा दिली होती .

परंतु हल्ली जेव्हा ही गोष्ट आठवली तेव्हा चटकन असे वाटले कि वरील अर्थ बरोबरच आहे पण एकूण मतितार्थ , एवढाच नाही . ह्या गोष्टीत खूप मोठा अर्थ दडलेला आहे . मनात अशी भावना येताच माझे मन ह्या गोष्टीत रमले व गोष्टीचा आशय , कारण मिमांसा याचे विश्लेषण करू लागले . हाच आशय तुमच्या पर्यंत पोहचविण्यासाठी हा लेख . आगीचा शब्दशः अर्थ जरी एखादी वस्तू पेटणे असा असला तरी हा शब्द बरेच वेळा आपल्या संभाषणात येतो . बघा आठवून ‘ कशाला दोघांच्यात आग लावतो आहेस ? ‘ कशाला आगीत तेल ओततो आहेस ? वगैरे .

खरेतर आग लागण्यासाठी प्राणवायु व अग्नि याची आवश्यकता असते . परंतु जेव्हा ती वस्तु ज्वलनशील मर्यादा ओलांडते तेव्हाच आग लागते . आगीशिवाय धूर येत नाही पण प्रत्येकवेळा धूर म्हणजे आग असतेच असे नाही . असो विषयांतर नको .

आज आपण आपल्या कुटूंबात , ऑफीसात , समाजात , विदेशात नजर टाकली तर चिमणीचे म्हणणे आपल्याला पटेल . आज आग विझवण्या-यांपेक्षा आग लावणा-यांची संख्याच जास्त आहे . पण मग ह्या सत्याला जबाबदार कोण ? जेव्हा मतभेद ( मग ते दोन कुटूंबातील व्यक्तींचे असोत , ऑफीस सहका-यांबरोबर असोत कि शेजा-याशी असोत ) सामोपचाराने

मिटवता येत नाहीत तेव्हा परक्या माणसाला हस्तक्षेप करायची संधी मिळते व हा मध्यस्थ आग भडकती ठेवण्याची शक्यता जास्त कारण ह्या आगीत त्याला स्वतःची पोळी भाजून घ्यायची असते.

त्यामुळेच मी म्हणेन कि जर का मतभेदाला ज्वलनशील मर्यादा ओलांडू दिली नाही तर आगीचे प्रसंग कमी होतील. पण हे घडण्यासाठी प्रत्येकाने आत्मशोध घेतला पाहिजे.

प्रत्येक माणूस जन्मतःच वाईट नसतो. भोवतालची परिस्थिती त्याची परिक्षा घेते व माणूस चांगला , वाईट , स्वार्थी , निस्वार्थी वगैरे गटात हळूहळू विभागला जातो. अर्थात अनुभवाने , शिक्षणाने माणसाच्यात सुधारणा होतेच. प्रत्येक जण सर्वच अर्थांनी सुखी समाधानी असणे शक्य नसते. कधी प्रयत्न कमी पडतात तर कधी नशीब साथ देत नाही. माणसाची सर्वच ध्येये , स्वप्ने पूरी होतात असे नाही. संकटांनी माणूस बेजार होतो. अशावेळी दुस-याचे सुख त्याला टोचू लागते व दुस-याच्या दुःखात तो समाधान शोधू लागतो. परंतु सर्वच लोकांच्या बाबतीत हे घडते असे नाही. माणसाची वैचारिक बैठक कशी आहे ह्यावरून तो माणूस सात्विक , राजस किंवा तामसी होतो. परंतु जगात अजूनही चांगल्या निस्वार्थी माणसांचा भरणा पुरेसा आहे त्यामुळे परिस्थिती आवाक्याबाहेर गेली नाहीये.

मतभेद टाळायचे असतील तर आत्मपरिक्षण गरजेचे आहे. आयुष्यात कसे वागले पाहिजे हा खरेतर एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. जर का ह्या नियमावलीनुसार आपण वागायचा प्रयत्न केलात व काही अंशी यशस्वी झालात तरी आपले नाव आग विझविण्या-यांच्या यादीत दिसायला हरकत नाही. **Spandane-The Art of Living, ABJ TTP – Possibility** हे लेखही वाचायला हरकत नाही. तात्पर्य एवढेच कि मतभेद टाळा. माणसाला माणुसकीने वागवा , निस्वार्थी मनाने दुस-याला मदत करा , दुस-याच्या सुखाने तुमचे मन भरून आले पाहिजे , कधीही चुकीचा सल्ला देऊ नका , अप्रिय सल्ला जर दुस-यासाठी श्रेयस्कर असेल तर तोच सल्ला द्या. दोघांच्या भांडणात फायदा मिळविण्याचा मोह टाळा . दोन माकडे , लोणी व कोल्हयाची गोष्ट तुम्हाला आठवत असेलच . दुस-याला निस्वार्थी मनाने मदत करून मिळणा-या निर्भेळ आनंदाचा अनुभव घ्या.

‘ आगलाव्या ’ लोकांचा अनुभव मला लहानपणीच आला. मी ६ वीत शिकत होतो. आमच्या शाळेत ५ वी ते ७ पर्यंत सूतकताई शिकवित. अगदी कापसापासून वेळू बनविणे , सूत कातणे , सूताला मागावर गुंडाळणे , कापड विणणे , गालीचे बनविणे वगैरे. मला हा वर्ग खूप आवडत असे. माझ्या मनात सहज विचार आला कि मागावर विणलेल्या कापडाचे सर काय करत असतील ? कारण कापड काही सर्वच चांगल्या दर्जाचे नसायचे. सूताचा दर्जा मुलागणीक बदालायचा. मी सहज तो विचार माझ्या बाकावर शेजारी बसणा-या मुलाकडे बोलून दाखविला. त्याने त्याच्या मित्राबरोबर विचार प्रकट केला. त्याचा परिणाम असा झाला कि वर्गातील एका व्रात्य मुलाने सरांचे माझ्या विरूद्ध कान फुंकले. त्याच्या म्हणण्यानुसार मी असे बोललो की ‘ सर हे कापड विकून पैसे स्वतःच्या खिशात टाकतात.’ सर मला हुशार मुलगा म्हणून ओळखत होते. तरी ते नाराज झाले. त्यांनी माझ्या वडिलांना भेटायला बोलावले. माझ्या दादांनी नेमकी तक्रार समजुन घेतली. माझ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. दादा सरांना भेटले. मलासुद्धा बोलावले. मी सत्य परिस्थिती न भिता सांगितली. दादांनी सुद्धा सांगितले की त माझ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. तसेच त्यांनी केलेल्या संस्कारामुळे माझा मुलगा कधीही चुकीचे आरोप करणार नाही. तुमचाच काहीतरी गैरसमज करून देण्यात आला आहे. सरांचे समाधान झाल्यासारखे वाटले व मग खात्रीच पटली. पुढील १ ½ वर्षे सर माझ्याशी परत एकदा चांगले वागू लागले. त्यांचा राग निवळला. वर्गातील माझ्या मित्रांनी काही दिवसांनंतर खोटी माहीती देण्या-या मुलाला सरांच्या समोर उभे केले. मी सरांना सांगितले की माझ्यावरील आरोप खोटा आहे हे सिद्ध झाल्यामुळे खोटी तक्रार करण्या-या मुलाला शिक्षा दिली किंवा नाही तरी मला काहीच फरक पडणार नाही. माझ्या नावावरील खोटा कलंक पुसला गेला ह्यात मला समाधान आहे. मला वडिलांचे शब्द आठवले. ते म्हणत कि तुम्ही जेव्हा एक विशिष्ट परिस्थितीत शक्तीमान असला तरी तुम्ही वागताना स्वतःचा तोल ढळू देता कामा नये. **You have to be fair to every body while holding position of strength.**

खोटया तक्रारीने आमच्यात ( मी , सर व दादा ) आग लागू शकली नाही कारण सर व दादा सामंजस्याने वागले. दादांच्या माझ्या वरचा विश्वास बघुन सरांची खात्री पटली. **Just because you are in drivers seat you should not**

**run over people**. ह्या प्रसंगातून मी खूप काही शिकलो. आपण कितीही विचारपूर्वक बोललो तरी कसा विपर्यास होऊ शकतो. सरांनीसुद्धा त्यांच्याकडील अधिकाराचा दुरूपयोग केला नाही. **Wait & watch** मार्ग निवडला व काही दिवसांनंतर खोटी कागाळी करणारा मुलगा त्यांच्यासमोर आल्यानंतर संपूर्ण प्रकरणातली हवाच गेली. माणसाने आणखिन एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की सल्ला जरी त्याला पटला नाही तरी सल्लागाराच्या हेतूबद्यल शंका घेता कामा नये. जेव्हा तुम्ही चूकता तेव्हा तुमची चूक सांगणारा तुमच्यावर प्रेमच करत असतो. जेव्हा चूक करताना कोणीही तुम्हाला ही चूक दाखविण्याच्या भानगडीत पडत नाही अशी वेळ तुमच्या आयुष्यात येणा–या खूप कठीण काळाची नांदी असते.

मित्रांनो तुमचा काय अनुभव ? तुमचे नाव कोणत्या यादीत आहे ? काय म्हणालात माझे नाव कोणत्या यादीत आहे ? शंका आहे ? विश्र्वास ठेवाल माझ्यावर ? माझे नाव आग विझविणा–यांच्या यादीत आहे. मला सांगायला अभिमान वाटतो (गर्व नाही ) कि कोणत्याही समस्येत मी सर्व बाजूनी निरपेक्षपणे विचार करू शकतो व व्यावहारिक सल्ला देऊ करतो. सल्ला लगेच जरी प्रश्नकार्त्याला रूचला नाही तरी कालांतराने माझे म्हणणे त्याला पटते व बरेचवेळा तो मोकळया मनाने ते मान्यसुद्धा करतो.